**Social Intelligence : The New Science of Human Relationship**

# सामाजिक बुद्धिमत्ता

**- Daniel Goleman**

डॅनियल गोलमन यांचे 'इमोशनल इंटलिजन्स' हे पुस्तक १९९५ साली प्रकाशित झाले. थोड्याच अवधीत ते लोकप्रिय झाले. जगभर त्याच्या पन्नास लाख प्रती विकल्या गेल्या.

त्यापूर्वी १९८३ साली हॉवर्ड गार्डनर यांचे 'फ्रेम्स ऑव्ह माईंड' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यामध्ये त्यांनी बुद्धिमत्तेविषयीचा आपला नवा सिद्धांत मांडला. सुरुवातीला सात आणि नंतर घातलेली एक भर अशा आठ बुद्धिमत्ता (आणखीही असण्याची शक्यता वर्तवून) त्यांनी सांगितल्या. त्यामधील दोन, बुद्धिमत्ता ह्या मानवी स्वभावाशी, भावभावनांशी आणि समाजात इतरांशी असलेल्या संबंधांबाबत होत्या. व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्ता ( Intrapersonal Intelligence ) आणि आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता ( Interpersonal Intelligence ) या दोन स्वतंत्र आणि तरीही परस्परसंबंधित अशा बुद्धिमत्ता असून माणसाचे स्वत:शी असलेले नाते आणि माणसाचे दुसऱ्यांशी असणारे नाते अनुक्रमे सांगणाऱ्या अशा या बुद्धिमत्ता आहेत. गार्डनरच्या या बहुविध बुद्धिमत्तांच्या सिद्धांताचा ( Theory of Multiple Intelligences ) संदर्भ येथे आवश्यक आहे; कारण, डॅनियल गोलमन यांचे 'इमोशनल इंटलिजन्स' हे १९९५ चे पुस्तक हे प्रामुख्याने गार्डनर यांच्या व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्तेशी संबंधित असून, ज्याचा परिचय या लेखात करून दिला जात आहे ते 'सोशल इंटलिजन्स' हे १९०६ साली प्रकाशित झालेले पुस्तक हे प्रामुख्याने आंतरव्यक्ती बुद्धिमत्तेबाबतचे विश्लेषण करणारे आहे.

डॅनियल गोलमन यांनी या ग्रंथाच्या प्रवेशकात ( Prologue ) असे म्हटले आहे की, "जेव्हा मी 'इमोशनल इंटलिजन्स' हा ग्रंथ लिहिला तेव्हा माझा सारा भर हा, व्यक्ती म्हणून, आपल्या अंतर्गत असणाऱ्या, आणि आपल्या स्वत:च्या भावना कह्यात ठेवण्याचे तसेच आपले सकारात्मक संबंध राखणारी संभाव्यशक्ती (Potential) या संदर्भातील मानवी क्षमतांवर होता. या गंथाच्यावेळी मात्र चित्र अधिक विस्तारते. ते एका व्यक्तीच्या अंतर्गत असणाऱ्या क्षमतांशी म्हणजे एका व्यक्तीच्या मानसशास्त्राशी संबंधित राहात नाही तर ते दोन व्यक्ती संबंधांच्या मानसशास्त्राकडे वळते. विशेषत: जेव्हा आपण दुसऱ्याशी संबंध बांधतो तेव्हा ते उद्‌भवते."

गोलमन यांचे आधीचे 'इमोशनल इंटलिजन्स' आणि आत्ताचे 'सोशल इंटलिजन्स' हे दोन्हीही ग्रंथ मानवी मनाचा वेध घेतात. मात्र ते भिन्न अशा दिशेने. एकात व्यक्तिअंतर्गत विश्वावर प्रकाश टाकला आहे तर दुसऱ्यात, व्यक्तींच्या परस्पर नात्यांतील विश्वावर लक्ष केंद्रित केले आहे. आणि म्हणूनच, प्रवेशकात गोलमन यांनी म्हटले आहे की हा ग्रंथ हा 'इमोशनल इंटलिजन्स' या ग्रंथाचाच सहचर आहे.

गोलमन यांच्या आधी फार पूर्वी, पियाजेने शारीर विज्ञानाधारित ज्ञाननिर्मितीचा सिद्धांत मांडला होता. गोलमन आता, सामाजिक संबंधांबाबतचा शरीरविज्ञानाधिष्ठित असा विचार मांडीत आहेत. त्यासाठी ते अलीकडच्या मेंदूसंशोधनांचा आधार प्रामुख्याने घेत आहेत. विशेष असे की हे मेंदूसंशोधन प्रामुख्याने, गोलमन यांच्या 'इमोशनल इंटलिजन्स' या ग्रंथाच्या प्रकाशनानंतरचे म्हणजे १९९५ नंतरचे आहे, असा उल्लेख त्यांनी आपल्या या ग्रंथात केला आहे. माणसा-माणसांचा संबंध हा त्यांच्या मेंदू-मेंदूंचा संबंध कसा असतो, आणि या संबंधांचा उगम मेंदूमधील पेशीबांधणीत असून, संबंधांच्या स्वरूपाने मेंदूमधील पेशीसमूहांमध्येही कसा बदल घडून येतो हे या ग्रंथात स्पष्ट करण्यात आले आहे.

**ग्रंथाचा नेमका विषय**

गोलमन यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या प्रवेशकातच ग्रंथाचा नेमका विषय काय आहे ते सांगितले आहे. सुरूवातीलाच ते, नव्याने उदयास येत असलेल्या एका नव्या शास्त्राचा-मज्जाशास्त्राचा उल्लेख करतात; आणि आपल्या विषयापुरता निष्कर्ष काढतात की, 'मज्जाशास्त्राने असे शोधून काढले आहे की, आपल्या मेंदूचा नकाशाच असा आहे की ज्यामुळे आपण 'मनजुळवे' किंवा समाजप्रिय ( Sociable ) झालो आहोत. ( आठवतं ? डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताचा आधार घेऊन, निसर्गतःच आपण 'स्पर्धक' आहोत असे आपण मानतो. मेंदूसंशोधनांतून गोलमनसारखे लोक दाखवून देतात की निसर्गतःच आपण 'सहकारप्रिय' आहोत ! ) जेव्हा आपले दुसऱ्याशी सूत जुळते तेव्हा ते मेंदूमेंदूमधील जुळलेले सूत असते. म्हणूनच या ग्रंथाच्या 'सोशल इंटलिजन्स' या शीर्षकाबरोबरच 'द न्यू सायन्स ऑव्ह ह्युमन रिलेशनशिप' असे उपशीर्षक दिलेले आहे. थोडक्यात, हे पुस्तक मानवी संबंधांविषयीचे नवे शास्त्र मांडणारे आहे.'

'सोशल इंटलिजन्स' या सुमारे साडेतीनशे पानी ग्रंथात सहा विभागात आणि त्याअंतर्गत एकवीस प्रकरणांमध्ये विषयाची विभागणी केली आहे. शिवाय प्रवेशक, उपसंहार व तीन परिशिष्टेही आहेत. या सगळ्या संभारांतून काही निवडक प्रश्नांचा शोध लेखकाने घेतला आहे. उदाहरणार्थ, मुले अधिक आनंदात वाढवीत यासाठी त्यांना आपण अधिक चांगली मदत करू शकतो का ? मूल आपल्या मेंदूचा आपल्या शिक्षणात अधिक चांगला वापर होण्याच्या दृष्टीने कसे काम करू शकेल ? असे काही शैक्षणिक प्रश्न किंवा, परस्परांशी वैरभाव असणारे समाजगट शांततेत कसे नांदू शकतील ? अथवा या सूक्ष्म बाबींचे आकलन झाल्यामुळे, ज्या तऱ्हेचे समाजरचनेचे स्वप्न आपल्यापुढे आहे तेथे कशातऱ्हेने जाता येईल ? असे व्यापक तात्विक प्रश्नही या ग्रंथात हाताळलेले आहेत.

**विभाग १**

चार्लस् डार्विन यांनी, सुमारे दिडशे वर्षापूर्वीच सांगून ठेवले आहे, की, दयाबुद्धीने केलेल्या कृतीच्या पाठीमागे जी सहानुभूतीची भावना असते, ते निसर्गाच्या साधनपेटीतील एक प्रभावी साधन असते. (डार्विनच्या 'स्पर्धे'च्या तत्त्वावर पुढे विचारांत नि व्यवहारांत खूपच भर दिला गेला; पण, ही सहकारवृत्तीची नैसर्गिकता विसरली गेली !) या सहानुभूतीतूनच सामाजिकतेचा उगम आहे, आणि म्हणून माणूस हा एक सामाजिक प्राणी बनलेला आहे. आधुनिक विचार असे सांगतो की, ही सामाजिकता हाच मानवासारख्या उच्चतर प्राण्यांमधील टिकून राहण्याची क्षमता निर्माण करणारी बाब आहे. लेखकाने ही भूमिका ग्राह्य मानून त्यामागील मेंदूमधील घटनांचा मागोवा घेतला आहे.

माणसाच्या सामाजिकतेची सुरुवात होते तीच मुळी परस्परसंवाद साधण्याच्या गरजेमधून; आणि ही गरज नैसर्गिक आहे आणि अगदी पुरातन काळापासून, म्हणजे ज्यावेळी माणूस गट करून राहायला लागला त्याकाळापासून चालत आलेली आहे. त्यामुळे तिने आता माणसाच्या मेंदूत आणि जनुकांमध्येही स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळे डॅनियल गोलमन यांनी मूळ सूत्रच असे मांडले आहे की आपली रचनाच मुळी सामाजिकतेची झाली आहे; कायमच आपला मेंदूकडून मेंदूकडे असा प्रवास चालू असतो आणि आपण सदैव चेतापेशींच्या बॅले नृत्यात दंग असतो.

ग्रंथाच्या या पहिल्या विभागात, माणसाचा हा 'सामाजिक मेंदू' असतो कसा आणि त्याचे विविध पैलू आपल्या दैनंदिन जीवनात कसे आढळतात हे अनेक उदाहरणे देऊन, दाखवून दिले आहे. किंबहुना संपूर्ण सामाजिक मज्जाशास्त्राची (Social neuroscience) मांडणी करण्याचा व त्यायोगे मानवी संबंधांबाबतचे चेतापेशीय गतिशास्त्रच (neural dynamics) मांडण्याचा प्रयत्न गोलमन यांनी केला आहे. या चेतापेशीय गतिशास्त्राच्या निर्मितीस कारणीभूत ठरणाऱ्या तीन महत्त्वाच्या घटना मेंदूसंशोधनांतून स्पष्ट झाल्या आहेत :

एक, मेंदूमधील चातीपेशींचा (Spindle cells) नव्याने लागलेला शोध. इतर चेतापेशींपेक्षा या पेशींची संख्या जास्त असते, आणि आपले त्वरीत घेतले जाणारे सामाजिक स्वरूपाचे जे निर्णय असतात त्यांचे वेगाने मार्गदर्शन करण्याचे काम या पेशी करतात.

दोन, असाच दुसरा लागलेला शोध म्हणजे प्रतिबिंब पेशींचा (mirror neurons) शोध. एकाच वेळी, दुसऱ्याच्या भावना कळून येणे, दुसऱ्याची होऊ घातलेली कृती लक्षात येणे, ही कामे या पेशी घडवून आणतात; त्याचबरोबर, दुसऱ्याच्या कृतीचे अनुकरण करणे व सहानुभूती वाटणे या क्रियाही आपल्याकडून करवून घेतात.

तीन, पुरुषाला, एखादी आकर्षक स्त्री त्याच्याकडेच डोळ्यात डोळे घालून पाहत असेल तर त्यावेळी त्याच्या मेंदूमध्ये डोपमाईन नावाचे आनंद-निर्मिती करणारे रसायन पाझरू लागते. ती दुसरीकडे कुठे पाहत असेल तर मात्र हे होत नाही ! हा आनंदवर्धक रसायनांच्या पाझरण्याचा शोध हा एक सामाजिक संबंधांच्या बाबतींतील एक महत्त्वाचा शोध म्हणता येईल.

माणसाचा सामाजिक मेंदू कसा कार्य करतो याची जाण देणारेच हे मेंदूसंशोधन आहे.

'सामाजिक मेंदू' म्हणजे, इतर लोक, त्यांच्याशी असलेले आपले संबंध, व तत्संबंधी आपले विचार व भावभावना यांबाबतची परस्पर देवघेव घडवून आणणाऱ्या चेतापेशीय हालचाली होय; अशी व्याख्या गोलमन यांनी दिली आहे.

आपले परस्परसंबंध जेवढे घट्ट तेवढा त्याचा आपल्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो आणि बिघडलेल्या संबंधांचा परिणाम आरोग्य बिघडवण्यात होतो याही वास्तवाची दखल येथे घेण्यात आली आहे.

माणसाचे जे काही सामाजिक वर्तन दिसून येते त्याची बिजे मेंदूमधील पेशींच्या व्यवहारात असतात. भाव-भावना तीव्र करणारा 'खालचा रस्ता' (The low road) आणि भाव-भावनांना विचारांशी संलग्न करून त्यांचे नियमन करणारा असा 'वरचा रस्ता' (The high road) यांचे केलेले सविस्तर वर्णन हा, मेंदूमधील भावनिक व त्यांकरवी सामाजिक व्यवहार कसे घडून येतात याची खोलवरची जाण देणारा आहे. या तात्विक बाबींमधून विविध तऱ्हेचा पण प्रत्यक्ष वर्तन कसकसा घडत असतो, याच्या विस्तारीकरणासाठी या भागाची सर्व पाने खर्ची करण्यात आली आहेत.

**विभाग २**

ग्रंथातील दुसऱ्या विभागात प्रामुख्याने बिघडणारे सामाजिक संबंध, त्यानुसार माणसाचे असणारे वर्तन आणि त्याची मेंदूमधील स्थाने व प्रक्रिया यांची चर्चा केली आहे.

❖